CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड




## जावयाकडून मारहाण;सासरे जखमी

**सोलापूर** : वरवटे (ता.मोहोळ) येथे मुलीला नांदविण्याच्या कारणावरून जावयाने केलेल्या मारहाणीत धोंडीबा तुळशीराम महाडकर (वय ४० रा.वरवटे) हे जखमी झाले.हे घटना रविवारी सायंकाळच्या सुमारास घडली. त्यांना कामती येथे प्राथमिक उपचार करून प्रभाकर (भाऊ) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. रविवारी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास त्यांना पवन गंगाराम वाघमोडे (जावई), महादेव खांडेकर आणि इतर ३ जणांनी मिळून दगड आणि लाथा बुक्क्याने मारहाण केली .अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

www.surajyadigital.com

। मंगळवार, दि. १७ सप्टेंबर २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ३४९ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# 'जीआर'मुळे पडली वादाची ठिगणी

# स्वकीयांची हत्यार उपसण्याची तंबी

## डोके ठिकाणावर ठेवण्याचा दोन आमदारांचा इशारा

**सोलापूर/विशेष प्रतिनिधी**

**धनगर समाजासाठी अनुसुचित जमाती अर्थात एसटी वर्गाचे आरक्षाण लागून करण्याच्या मागणीवर पंढरपूर शहरात सुरू असलेल्या आंदोलनाची दखल घेवून राज्य सरकारकडून धनगड आणि धनगर एकच आहेत, असा जीआर काढण्याचा निर्णय रविवारी मुंबईत घेण्यात आला होता. मात्र, त्याला खुद्द महायुतीतूनच विरोध होत असल्याने निवडणुकीच्या तोंडावर महायुतीत वादाचा वणवा भडकण्याची शक्यता वर्तवली जातेय. महायुतीच्या नेत्यांना या प्रश्नाची एक मोठे डोकेदुखी लागून राहिली आहे.**




### सरकारची डोकेदुखी वाढली



नरहरी झिरवाळ डॉ.लहामटे

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीनंतर शंभूराज देसाईंनी याबाबत माहिती दिली. आता या निर्णयाला महायुतीच्याच नेत्यांमधून विरोध होत असल्याचे दिसून येत आहे.

सुरुवातीला विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांनी या निर्णयाला विरोध दर्शवला. यानंतर आता राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार डॉ. किरण लहामटे यांनीही महायुती सरकारला घरचा आहेर दिला आहे. आदिवासी समाजाच्या आरक्षणाला धक्का लावू नका. तसे झाले तर उग्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल, असा इशाराच डॉ. लहामटे यांनी महायुती सरकारला दिला आहे.

डॉ. लहामटे म्हणाले की, धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्याचा ज्यांनी कोणी निर्णय घेतला, त्यांचा मी निषेध करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ४७ जमातींना आरक्षण दिले आहे आणि त्यात कोणाचाही समावेश होवू शकत नाही. घटनेची कोणी पायमल्ली करू नये. धनगर समाजाला आरक्षण द्यायचे असेल तर स्वतंत्र द्या. धनगर आणि आदिवासी समाजाचा काही संबध नाही. त्यांची संस्कृती स्वतंत्र आहे. सरकार असे का विचार करतेय? किंवा काही संघटनांना का वाटतेय की आदिवासी समाजाचे आरक्षण मिळावे. आदिवासी समाजाच्या आरक्षणाला धक्का लावू नका. तसे झाले तर उग्र स्वरूपाचे आंदोलन केल जाईल, असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

मुंबईला जो पाणीपुरवठा होतो तो आदिवासी भागातून होतो. त्यामुळे आदिवासी समाजाला कायदा हातात घ्यायला लावू नका. धरणासाठी जमिनी आम्ही दिल्या, शोषण आमचे झाले आहे. घटनेने आम्हाला जे आरक्षण दिले आहे, त्यावर जर इतरांचा डोळा असेल तर ते चालणार नाही. आरक्षण दिले, त्याची भरती देखील होत नाही. त्यात आमच्या आरक्षणात दुसऱ्याला घुसवताय, हे निषेधार्ह आहे. सरकारने पुन्हा एकदा डोक ठिकाणावर ठेवून निर्णय घ्यावा, असा इशाराही डॉ. लहामटे यांनी दिला.

### ...तर रस्त्यावर फिरकू देणार नाही.

सोलापूर शहरातील भाजप आमदार सुभाष देशमुख यांच्या निवासस्थानासमोर धनगर समाजाच्या कार्यकर्त्यांनी ढोल वाजवून आंदोलन केले आहे.आंदोलक शेखर बंगाळे आक्रमक झाले असून त्यांनी आमदार सुभाष देशमुख यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. सोलापुरातील लोकप्रतिनिधींनी आंदोलनास्थळी भेट द्यायला हवी होती. भाजपचे आमदार सुभाष देशमुख, विजयकुमार देशमुख यांनी आंदोलन स्थळावर जाऊन भेट दिली नाही.आजतागायत लोकशाही मार्गाने आंदोलने केली. माजी पालकमंत्री राधाकृष्ण विखे–पाटील यांच्यावर भांडारा उधळून धनगर आरक्षणाची मागणी केली होती. तरीही सरकार धनगर आरक्षणासाठी जागे होत नाही. धनगर आरक्षणासाठी आमदारांना रस्त्यावर फिरकू देणार नाही,असा इशाराही त्यांनी दिला.

### काय म्हणाले झिरवाळ?

झिरवाळ म्हणाले की, हा विषय वर्षानुवर्षे सुरू आहे. धनगर समाजाला आरक्षण द्यावे, यावर आमचे दुमत नाही. पण आमच्यातून आरक्षण देऊ नये. माझी सरकारला विनंती आहे की, जसे त्यांना बोलावले जाते, तसे आम्हालाही बोलवावे. आमचे नेते आहेत, मंत्री आहेत, त्याांना बैठकीला बोलवायला हवे होते. मी विधानसभा उपाध्यक्ष असल्याने सर्व समाजाचे माझ्याकडे लक्ष आहे. आदिवासींच्या धर्तीवर आरक्षण देऊ असे म्हटले होते. पण आदिवासींमधूनच आरक्षण देण्याचा अट्टहास का? सरकारच्या निर्णयाविरोधात आदिवासी आमदार, नेते, संघटना सर्व एकत्र येतील. आम्ही सर्व आदिवासी नेत्याांची बैठक घेऊन पुढील भूमिका स्पष्ट करणार आहोत. विरोध करायचा की न्याय मागायचा? हा निर्णय घेतला जाणार आहे. धनगर आरक्षणाच्या मुद्यांवर आम्ही आजही राजीनाम्यावर ठाम आहोत. आम्ही लवकर पुढची भूमिका स्पष्ट करणार असे नरहरी झिरवाळ यांनी म्हटले आहे मराठ्यांसाठी राजीनाम्याची घोषणा मग आमच्यासाठी काय निर्णय घेणार?

---

## फॅन्सी नंबरप्लेट अन् सायलेन्सरवर फिरविला रोड रोलर

### शहर वाहतुक शाखेची कारवाई



**सोलापूर** : शहर वाहतूक शाखेच्या वतीने फॅन्सी नंबरप्लेट व सायलेन्सर यांच्यावर कारवाई करण्यात आली होती. अशा २०० सायलेन्सर व ३ हजार फॅन्सी नंबरप्लेटवर सोमवारी शहर वाहतुक शाखेच्या ऑफिस समोरील मैदानावर रोड रोलर फिरवल्याचे सहाय्यक पोलिस आयुक्त सुधीर खिरडकर यांनी दै. सुराज्यशी बोलताना सांगितले.

शहर वाहतूक शाखेच्या वतीने गेल्या ४ ते ५ महिन्यापासून शहरात फॅन्सी नंबरप्लेट व मोठ्याने आवाज काढणारे सायलेन्सर लावून फिरणाऱ्या मोटारसायकल व बुलेट चालकांवर वेगवेगळ्या चौकात कारवाई केली होती. या जप्त केलेल्या फॅन्सी नंबरप्लेट व सायलेन्सर शहर वाहतुक नियंत्रण शाखेच्या मैदानात ओळीने लावण्यात आले. त्यावर रोड रोलर फिरविण्यात आला. यावेळी पोलिस निरीक्षक तानाजी दराडे व सुरज मुलाणी तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**सुराज्य** सोलापूर

### उद्याचा अंक नाही

अनंत चतुर्दशीनिमित्त सुराज्य कार्यालयास मंगळवार दि.१७ सप्टेंबर २०२४ रोजी सुट्टी असल्याने उद्या बुधवार दि. १८ सप्टेंबर २०२४ चा अंक प्रकाशित होणार नाही, याची नोंद वाचक, विक्रेते, जाहिरातदार यांनी घ्यावी, ही विनंती.

**–व्यवस्थापकीय संपादक**


## समर्थकांचा निर्णय काडादींना मान्य

**सोलापूर/प्रतिनिधी**

सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे मार्गदर्शक संचालक धर्मराज काडादी यांनी दक्षिण सोलापूर मतदारसंघातून निवडणूक लढवावी, असा आग्रह महाविकास आघाडीचे नेते आणि त्यांच्या समर्थकांकडून होत आहे.

सोमवारी 'गंगा' निवासस्थानी झालेल्या सिद्धेश्वर परिवाराच्या बैठकीत समर्थकांचा दबाव काडादी यांनी मान्य केला आहे. समर्थकांसह नेत्यांची साथ मिळाली तर दक्षिण विधानसभा लढवण्याचा निर्धार काडादी यांनी केला आहे. त्यानंतर तातडीने शिष्टमंडळाने माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि खा. प्रणिती शिंदे यांची भेट घेतली.

महाविकास आघाडीतील काँग्रेसकडे दक्षिण सोलापूर मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी सर्वाधिक इच्छुक आहेत. येथून धर्मराज काडादी यांनी विधानसभेची निवडणूक लढवावी, यासाठी गेल्या काही महिन्यांपासून त्यांच्यावर नेते मंडळीकडूनही आग्रह केला जात आहे. अखेर तो निर्णय काडादी यांनी मान्य केला आहे. त्यानंतर सिद्धेश्वर साखर कारखान्याचे अध्यक्ष पुष्कराज काडादी,वळसंग सूत गिरणीचे चेअरमन राजशेखर शिवदारे, तम्मा मसरे, शरणू काडादी, अशोक बिराजदार, अरूण लातुरे, शिवानंद पाटील, हरिष पाटील यांच्यासह देवस्थान पंच कमिटीच्या सदस्यांनी टाकळी येथील जाई- जुई फार्महाऊसवर माजी मंत्री सुशीलकुमार शिंदे, खा. प्रणिती शिंदे यांची भेट घेतली. यावेळी सुशीलकुमार शिंदे यांनी शिष्टमंडळाचे निवेदन स्वीकारले. त्यानंतर खा. शिंदे यांच्याशी शिष्टमंडळाने सविस्तर चर्चा केली. काँग्रेसकडून माजी आमदार दिलीप माने, काँग्रेसचे पक्षाचे जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे, उद्योजक महादेव कोगनुरे, माजी नगरसेवक बाबा मिस्त्री, रमेश हसापुरे हे इच्छुक आहेत. आता काडादी यांच्यामुळे उमेदवारी कोणाला द्यावी, याचा पेच पक्षश्रेष्ठींपुढे असणार आहे. महाविकास आघाडीतील इच्छुकांपैकी सर्वाधिक संमती धर्मराज काडादी यांच्या नावावर होऊ शकते, अशी चर्चा आता सुरू आहे.



**सोलापूर : सिद्धेश्वर साखर कारखान्याचे शिष्टमंडळ आणि काडादी समर्थकांनी खा.प्रणिती शिंदे यांची भेट घेतली.**

### ... तर अतंर्गत विरोध होणार नाही

सध्या काँग्रेस पक्षाकडून सुमारे १८ ते २० जण निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहेत आणि काँग्रेस पक्षातील प्रत्येक गटाकडून एकमेकाला विरोध होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे धर्मराज काडादी हे जर उमेदवार म्हणून पुढे आले विरोध कमी होईल अशी चर्चा दक्षिण मध्ये ऐकण्यास मिळते.

### नेत्यांचे सहकार्य मिळल्यास दक्षिण लढवण्याचा निर्धार




दक्षिणमधून निवडणूक लढवावी म्हणून समर्थक दबाव टाकत आहेत. समर्थकांसह महाआघाडीतील सर्व नेत्यांची साथ मिळाल्यास आपण निश्चित विधानसभा निवडणूक लढवू.

**–धर्मराज काडादी,**
**सिद्धेश्वर कारखाना मार्गदर्शक संचालक**

## आता श्रीनगरच्या लाल चौकात बिनधोक फिरा

### सुशीलकुमार शिंदेंना अमित शाह यांचा टोला

**श्रीनगर/वृत्तसंस्था**



केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सोमवारी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांना टोला लगावला. शिंदे यांनी श्रीनगरच्या लाल चौकात खुशाल, बिनधोक फिरावे त्यांना काही धोका नाही असे शाह म्हणाले. त्यांचे हे वक्तव्य चर्चेत आले आहे.सोमवारी काश्मीर येथील रॅलीला संबोधित करताना शाह यांनी शिंदेंवर टीका केली आहे. ''सुशीलकुमार शिंदे हे काँग्रेसच्या कार्यकाळात देशाचे गृहमंत्री होते. ते गृहमंत्री असताना श्रीनगरच्या लाल चौकात गेले होते, मात्र, तिथे फिरायची भीती वाटत होती, असे विधान शिंदे यांनी केले होते. हा धागा पकडून शाह म्हणाले की, मी आज त्यांना सांगू इच्छितो की, शिंदेसाहेब तुम्ही लाल चौकात बिनधोकपणे फिरा, तुमच्या मुलांनाही घेऊन या. तुम्हाला काही करायची कुणाचीही हिंमत होणार नाही.''


### शिंदे काय म्हणाले होते?

''मी गृहमंत्री होण्याआधी शिक्षण तज्ज्ञ विजय धर यांची भेट घेतली होती. मी त्यांचा सल्ला अनेकदा घ्यायचो. त्यांनी मला सांगितले होते की, तुम्ही श्रीनगरच्या लाल चौकात जा, तिथे लोकांना भेटा. लोकांना वाटले होते की, गृहमंत्री इथे फिरत आहेत. मात्र, मी आतून घाबरलो होतो हे कुणाला सांगणार? '' असे शिंदे म्हणाले होते. त्यांच्या या वक्तव्याची चांगलीच चर्चाही झाली होती. आता शाह यांनी बिनधोकपणे लाल चौकात फिरा असे म्हणत सुशील कुमार शिंदेंना टोला लगावला आहे.

---

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



बाप्पा, हा मानव खूप आशावादी आहे!

| कल्याण |
| --- |
| 370-08-260 |

| मुंबई |
| --- |
| 680-40-190 |

## सदाभाऊ कडाडले

## निवडणुकीत आघाडीच्या नेत्यांना चाबकाने फोडूनच काढतो



**सोलापूर/प्रतिनिधी**

**शेतकऱ्यांचे प्रतिनिधीत्व करणारे रयत क्रांती संघटनेचे संस्थापक आमदार सदाभाऊ खोत यांचे भाषण म्हणजे जणू मुलूक मैदान तोफच.अस्सल ग्रामीण शैलीतील ढंगदार भाषण ऐकायचे झाल्यास समोर उसळूनच जात असतो.सदाभाऊ हे भाजपच्या आश्रयला असल्याने महाविकास आघाडीच्या नेत्यांनी चिरफाड करून टाकत असतात. सांगतील शिराळ्यातील त्यांचे आक्रमक भाषण राज्यभर गाजत आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात आग लावण्याचे काम शरद पवार करीत आहेत. हे मराठा समाजाने वेळीच ओळखले पाहिजे. सगळे दिल्यानंतर या राज्यात मराठा समाजात दुही माजवण्याचे काम केले जात आहे. आघाडीतील सर्वच नेते अक्षरश: वळू बनले आहेत.निवडणुकीत या सर्वांना चाबकाने फोडून काढणार असल्याचा खणखणीत इशारा खोत यांनी दिला आहे.**

शिराळा (जि. सांगली) येथील रयत क्रांती कार्यालयाचे उद्घाटन रविवारी झाले. त्याप्रसंगी बोलताना खोत यांनी मराठा आरक्षणाच्या आघाडी नेत्यांच्या भूमिकेवर कडाडून हल्ला केला.महाविकास आघाडीच्या नेत्यांनी मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण द्यायला आमचा पाठिंबा आहे, असे पत्र मनोज जरांगे पाटील आणि सरकारला द्यावे. मी अनेकदा आवाहन केले आहे की, महाविकास आघाडीची जी माणसे निवडून आली आहेत, त्यांनी सरकार आणि मनोज जरांगे पाटील यांना पत्र लिहून द्यावे. 'मी खासदार अमुक...अमुक लिहून देतो की मराठा समाजाला ओबीसीमध्ये समावेश करायला माझा पाठिंबा आहे. अशा आशयाचे पत्र आघाडीच्या लोकप्रतिनिधींकडून का दिले जात नाही, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. रोहित पवार हा विद्वान माणूस आहे, महाराष्ट्रात आग लावत सुटलाय. भाडोत्री सोशल मीडिया महाराष्ट्रात तुम्ही ठेवलाय.. रोहित पवार तुम्ही लिहून द्या की, मराठा समाज ओबीसीमध्ये समावेश करायला या रोहित पवाराचा पाठिंबा आहे. द्या लिहून हे. महाराष्ट्रात आग लावायचे धंदे बंद करा.. लोकसभेला जमलं म्हणून आता विधानसभेला जमेल ही भावना मनातून काढून टाका, असा सल्लाही खोत यांनी दिला. महायुतीचे सरकार सत्तेत आल्यावर अनेक चांगले निर्णय घेतले. अनेक योजना आणल्या. पण, महाविकास आघाडीचे नेते टीका करतात. पण, येणाऱ्या निवडणुकित या महाविकास आघाडीतील वळूंना चाबकाने फोडून काढणार आहे, असा इशाराही खोत यांनी दिला.

### राऊत म्हणजे घरकोंबडा

खोत यांनी उद्धव ठाकरे शिवसेनेचे नेते संजय राऊत यांच्यावर जोरदार टीकास्त्र सोडले. राऊत नावाचा एक घरकोंबडा दररोज आरोळी देतो. त्या कोंबड्याला सांगतो, रोज बांग देऊ नकोस खुराड्यातनं.. तू एक पत्र लिहून दे मनोज जरांगे पाटलांना, मी उबाठा शिवसेना मराठा समाजाला ओबीसीमध्ये समाविष्ट करायला पाठिंबा देत आहे. अरे बघूया कोंबड्या तुझ्यात जोर आहे का?

CMYK